Dhanvarsha

October 01, 2021

To
The Manager,
Department of Corporate Relationship
BSE Limited
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street, Fort, Mumbai - 400 001.

Scrip Code: 540268

Dear Sir/Madam,

**Subject: Newspaper Publication of Intimation of Record Date for Sub-Division of Shares of the Company.**

In compliance with Regulation 30 read with Schedule III and other applicable provisions of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, as amended from time to time, please find enclosed herewith a copy of newspaper publications published on October 01, 2021 pertaining to intimation of record date for sub-division of equity shares of the Company:

1. Financial Express (all editions) (English); and
2. Mumbai Lakshadeep (Mumbai edition) (Marathi).

The same is also uploaded on the website of the Company viz. www.dfltd.in.

Kindly take the same on your record and acknowledge the receipt.

Thanking you,

Yours faithfully,
**For Dhanvarsha Finvest Limited**

**Lalit Chendvankar**
**Company Secretary and Compliance Officer**
**ACS No. A20699**

Encl: a/a

# ३ हजार हेक्टवरील पीक उद्धवस्त; नाशिकमधल्या ४८१६ शेतकऱ्यांचे नुकसान



**नाशिक, दि. ३०, (प्रतिनिधी) :** नाशिक जिल्ह्यातल्या मालेगावमध्ये सप्टेंबरमध्ये झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले असून, तब्बल तीन हजार हेक्टवरील पीक उद्धवस्त झाले आहे. त्यामुळे शेतकरी हतबल झाला आहे.

यंदा नाशिक जिल्ह्याकडे सुरुवातीला पाठ फिरवलेल्या पावसाने सप्टेंबर महिन्यात जोरदार हजेरी लावली. त्यामुळे जिल्ह्यातील धरणे भरली. अनेक ठिकाणी दोन-दोनदा पूर आले. सप्टेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात झालेल्या पावसाने मालेगाव तालुक्यातल्या सहा गावांना जबर फटका बसला आहे. त्यामुळे तालुक्यातील ४८१६ शेतकऱ्यांचे तब्बल ३००७.५३ हेक्टरवरील पीक मातीमोल झाले आहे. पंचायत समितीच्या संयुक्त पथकाने केलेल्या पाहणीत ही भीषण माहिती समोर आली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून सुरूअसलेल्या पावसाने कांद्याचे पीक धोक्यात आले आहे.

अनेक शेतकऱ्यांनी कांदारोप लागवडीसाठी तयार केले होते. मात्र, या रोपाचेही नुकसान झाले आहे. शेतात पाणी साचल्याने ही रोपे पिवळी चुटूक पडली आहेत. सध्याच्या पावसाने भुईमूग, बाजरी, कापूस, मका, मूग, मठ या पिकांचेही अतोनात नुकसान झाले आहे. जिल्ह्यात अनेक ठिकाणी शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेले पीक पावसाने हिरावून नेले आहे. सध्या सोयाबीन, कांद्याचे भाव दिवसेंदिवस उतरत आहेत. शेतकऱ्यांच्या खिशात पैसे नाहीत. अशा स्थितीतमध्ये वीजबिल वसुलीचा तगादा लावू नये. पंजाबच्या धरतीवर वीजबिल माफी करावी, अशी मागणी शेतकरी करत आहेत. सोबतच पावसाने झालेल्या नुकसानीचे पुन्हा एकदा पंचनामे करावे. या शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी होत आहे.

**शेतकऱ्यांना पुन्हा धास्ती**

मुंबईच्या प्रादेशिक मौसम विज्ञान केंद्राच्या सूचनेनुसार २८ सप्टेंबर रोजी विभागातील नाशिकसह काही जिल्ह्यात अतिवृष्टीची शक्यता वर्तवली आहे. नाशिक जिल्ह्यातील काही ठिकाणी विजेच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हस्त नक्षत्राला सोमवारपासून सुरुवात झाली आहे. सोमवारी सकाळी ६ वाजून ४२ मिनिटांनी सूर्याने हस्त नक्षात्रात प्रवेश केला. या नक्षत्राचा वाहन घोडा आहे. त्यामुळे खंडित स्वरूपाचा पाऊस होईल. यापूर्वीच्या उत्तरा नक्षत्राचे वाहन म्हैस असल्याने जोरदार पाऊस झाला, असा अंदाज दाते पंचांगामध्ये वर्तवण्यात आला आहे.

# मतदार यादीतून नाशिकमध्ये ७३ हजार नावे वगळली, पण तब्बल २ लाख ८७ हजार दुबार नावांचे काय?

**नाशिक, दि. ३०, (प्रतिनिधी) :** नाशिकमध्ये मतदार यादीतून ७३६५० नावे वगळण्यात आली आहेत. यातल्या अनेक नावांचे छायाचित्र, पत्ता, नाव सारखे असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

निवडणूक शाखेने सॉफ्टवेअरच्या माध्यमातून ही दुबार नावे शोधली आहेत. ही नावे शोधण्यासाठी प्रशासनाला तब्बल वर्षाचा कालावधी लागल्याचे समजते. मात्र, दुसरीकडे ऐन महापालिका निवडणुकीच्या तोंडावर नाशिकमधल्या मतदार याद्यांमधील घोळ उघडकीस आला आहे. नाशिक पूर्व, नाशिक पश्चिम आणि नाशिक मध्य या तीन मतदार संघाच्या याद्यांमध्ये शे-दोनशे नव्हे, तर चक्क तब्बल २ लाख ८७ हजार नावे दुबार आढळल्याने खळबळ निर्माण झाली आहे. शिवसेनेच्या दहा सदस्यांच्या पथकाने हा घोळ उघडकीस आणला आहे. त्यांनी तीन महिन्यांत मतदार यांद्याची अक्षरशः छाननी केली. तेव्हा नाशिक पश्चिम मतदारसंघात १ लाख २२ हजार २४२ मतदार दुबार आढळे. नाशिक पूर्व मतदारसंघात ८८ हजार ९३२ आणि नाशिक मध्य मतदारसंघामध्ये ७६ हजार ३१९ मतदार दुबार आढळले आहेत. या साऱ्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी सूरज मांढरे यांनी मतदार यादी शुद्धीकरण मोहीम सुरू केली आहे. याअनुषंगाने नागरिकांनी दुबार नावे कमी करण्यासाठी मतदार यादी शुद्धीकरण मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. मतदार यादीमध्ये कोणी जाणीवपूर्वक दुबार नावे सुरूठेवली असल्याची बाब निदर्शनास आल्यास अशा व्यक्तिंविरोधात निवडणूक कायद्या अंतर्गत फौजदारी कारवाई सुद्धा होऊ शकते, असा इशाराही त्यांनी दिला आहे. आता या शुद्धीकरण मोहिमेला किती दिवस लागतील, असा प्रश्न निर्माण झाला आहे. कारण येत्या फेब्रुवारी २०२२ मध्ये नाशिक महापालिकेची निवडणूक आहे. त्यामुळे ७३ हजार नावे वगळली, पण तब्बल २ लाख ८७ हजार दुबार नावांचे काय आणि ती कधी वगळणार असा प्रश्न उपस्थित होत आहे.

**प्रक्रिया अतिशय किचकट**

दुबार नावे वगळण्याची प्रक्रिया अतिशय किचकट आहे. अनेक मतदारांची नावे ही दोन मतदार संघामध्ये आहेत. त्यामुळे नियमानुसार संबंधित मदाराला नोटीस द्यावी लागेल. त्यातील कोणत्या मदारसंघामध्ये नाव ठेवायचे याची विचारणा करावी लागेल. त्यानंतरच पुढील निर्णय होईल. एकीकडे सॉफ्टवेअर असताना दुबार नावे शोधायला वर्ष लागला. मात्र, या किचकट प्रकियेतून पावणेतीन लाख मतदारांची दुबार नावे केव्हा शोधणार, असा प्रश्न आहे.

**यापूर्वीही राबवली मोहीम**

नाशिकमध्ये २०१९ ते २०२१ या काळात मतदार यादी संक्षिप्त मोहीम राबवली गेली. त्यातही जवळपास ८०६०५ दुबार नावे वगळण्यात आली आहेत. त्यामध्ये १६०७४ मृत, १५८७७ दुबार, ४८०२४ स्थलांतरीत नावांचा समावेश आहे. इतके सारे करूनही दुबार नावांचा घोळ सुरू आहे.



# घरगुती गॅस सिलेंडरमधून गॅस काढून घेणारी टोळी जेरबंद



**पुणे, दि. ३०, (प्रतिनिधी) :** दापोडीत घरगुती गॅस सिलेंडरमधून गॅस काढून तो हॉटेलला विकणाऱ्या टोळीचा सामाजिक सुरक्षा पथकाने छापा टाकून पर्दाफाश केला आहे. विशेष म्हणजे गॅस रिफलिंग करताना आरोपींना पकडण्यात आल आहे. एकूण १२ जणांवर गुन्हा दाखल करत ६ लाख ९७ लाखांचा मुद्देमाल सामाजिक सुरक्षा पथकाने जप्त केला आहे. नागेंद्रपाल योगेंद्रपाल सिंह, छोटू श्रीभगवान बघेल अशी गॅस रिफलिंग करणाऱ्या आरोपींची नावे आहेत.

या कारवाईमध्ये देगलूरकर गॅस एजेंसी, वंदना गॅस एजन्सी, कांकरिया गॅस एजन्सी येथील घरगुती गॅस सिलेंडरमधून २ किलो गॅस काढून घेतला जात होता. परंतु, याची भणक संबंधित गॅस चालक मालकांना आरोपीनी होऊ दिली नाही, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दापोडी येथील वसंत काटे यांच्या मोकळ्या जागेत बन्टुसिंह हा देगलूरकर गॅस एजन्सी, वंदना गॅस एजन्सी, कांकरिया गॅस एजन्सीचे घरगुती वापराचे गॅस सिलेंडर प्राप्त करून देत होता. तर, देविदास बिरादार हा विविध हॉटेलला गॅस विक्री करत होता. अशा प्रकारे दोघांची अवैध गॅस विक्री जोरात सुरूहोती. या प्रकरणाची माहिती सामाजिक सुरक्षा पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अशोक डोंगरे यांना माहिती मिळाली.

त्यानुसार, दापोडी येथील वसंत काटे यांच्या मोकळ्या जागेत जाऊन तिथे छापा टाकला असता गॅस रिफलिंग केली जात असल्याच उजेडात आलं. या प्रकरणी चालक आणि मालक अशा एकूण १२ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून ६ लाख ९७ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. घरी गॅस एजन्सीकडून गॅस वितरित होताना त्याचे वजन करून घ्यावे, जेणेकरून आपली फसवणूक होणार नाही. टाळाटाळ केल्यास संबंधित एजन्सीला त्यांची तक्रार करा, असे आवाहन सामाजिक सुरक्षा पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक डोंगरे यांनी केले आहे.

# पुण्यात २ आंतरराष्ट्रीय बुकींना बेड्या

**पुणे, दि. ३०, (प्रतिनिधी) :** आयपीएल सामन्यांवर सट्टा घेणाऱ्या दोन आंतरराष्ट्रीय बुकींना अटक केल्यानंतर बेटिंगचा मोठा बाजार समोर आला आहे. बेटिंगमधून आलेला पैसा हवाला रॅकेट व सोन्याच्या देवाणघेवाणीचे व्यवहारासाठी केला जात असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. त्या दृष्टीने पोलिसांनी तपास सुरूकेला आहे. या दोन बुकींच्या संपर्कात असलेले बुकी पोलिसांच्या रडारवर आले आहेत. गणेश भिवराज भुतडा (वय ५०, रा. त्रिमूती सोसायटी, रस्ता पेठ) आणि अशोक भवरलाल जैन (वय ४६, रा. हाईड पार्क, मार्केट यार्ड) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी दोघांच्या विरुद्ध समर्थ व मार्केटयार्ड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या दोघांकडून ९३ लाख ४२ हजार रुपयांची रोकड जप्त केली आहे. यातील ९२ लाखांची रोकड भुतडाकडे मिळाली आहे. भुतड याचा कंन्स्ट्रक्शनचा व्यवसाय आहे. तर, जैन याचा इलेक्ट्रीकचा व्यवसाय आहे, अशी माहिती पोलिस निरीक्षक शिल्पा चव्हाण यांनी दिली. पोलिस आयुक्त अमिताभ गुप्ता यांना बेटींगबाबत माहिती मिळाली होती. त्यानुसार त्यांनी कारवाईच्या सूचना दिल्या होत्या. दुबई येथील आबुधाबीमध्ये सुरूअसलेल्या चेन्नई सूपर किंग आणि कोलकत्ता नाईट राईडर्स यांच्यातील आयपीएल मॅचवर हे दोघे बेटींग घेत होते. पथकाने रास्ता पेठ व मार्केटयार्ड येथे एकाचवेळी ही कारवाई केली. हे दोघे बुकी क्रिकेट लाइन गुरु, बेटवेअर, क्रिकेट एक्सचेंज या ॲपव्दारे मोठ्या प्रमाणावर बेटिंग घेत असल्याचे आढळून आले.

# ‘‘कात्रजचा खून झाला’’ पुण्यात विचित्र होर्डिंग, भारती विद्यापीठ पोलिसात गुन्हा

**पुणे, दि. ३०, (प्रतिनिधी) :** पुण्यातील प्रसिद्ध कात्रज चौकाजवळ ‘‘कात्रजचा खून झाला’’ असे विचित्र होर्डिग लावणाऱ्याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सार्वजनिक मालमत्तेचे विद्रुपीकरण केल्याच्या कायद्यानुसार अनोखळी व्यक्तीच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती आहे.




**काय आहे प्रकरण?**

या प्रकरणी हनुमंत तुकाराम लोणकर (वय ५२ वर्ष, रा. कोंढवा, पुणे) यांनी भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. ‘‘कात्रजचा खून झाला’’ असं मोठ्या अक्षरात लिहिलेल्या आणि रक्ताने माखलेला सुरा असलेल्या या विचित्र होर्डिगवरुन मंगळवारी दिवसभर पुणे शहरात मोठ्या प्रमाणात चर्चा रंगली होती. तसेच त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरणही पसरले होते.

**पोस्टरबाज अज्ञात**

विशेष म्हणजे पोलीस चौकीपासून अवघ्या १०० मीटर अंतरावर अशा प्रकारचा प्रक्षोभक बॅनर लावल्यामुळे परिसरात विविध चर्चांना उधाण आले होते. मात्र हा बॅनर नेमका कोणी आणि कधी लावला, ते लिहिण्यामागील कारण काय, हे अजून अस्पष्ट आहे. बॅनरचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत.

**अनधिकृत होर्डिगचे मोठे जाळे**

दरम्यान, कात्रज परिसरात अनधिकृत होर्डिगचे मोठे जाळे पसरल्याचे दिसत आहे. आकाश चिन्ह विभागाकडून दुर्लक्ष होत असल्याचा सूर स्थानिक रहिवाशांनी लावला आहे. पुणे महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने हा बॅनर काढला.

**पुण्यातील बॅनरबाजी**

पुणेरी पाट्या जगभरात प्रसिद्ध आहेत. शहरातील प्रत्येक घरासमोर लावलेल्या विशेष संदेश देणाऱ्या पाट्यांनीही पुण्याला एक ओळख दिली आहे. मात्र गेल्या काही वर्षात त्याच्या एक पाऊल पुढे जात पुण्यात पोस्टर संस्कृतीही रुजताना दिसत आहे. प्रसिद्धीसाठी कोण काय करेल याचा काही नेम नसतो. त्यात विषय पुण्याचा असेल तर मग बोलायलाच नको. याआधीही पुण्यातील नागरिकांनी अनेक नवे ट्रेंड सेट केले आहेत.

**जुन्नरमध्ये १२५ फुटी बॅनर**

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात असाच प्रकार पाहायला मिळाला होता. जुन्नरमध्ये आपल्या प्रसिद्धीसाठी एकाने थेट १२५ फुटी बॅनर लावला होता. इतकंच नाही, तर आपले किती समर्थक आहेत, याचं प्रदर्शन करण्यासाठी या पठ्ठ्याने शेकडो लोकांच्या फोटोंचा कोलाजच तयार केला होता. त्यामुळे या बॅनरजी जोरदार चर्चा रंगली होती.

**‘हॅप्पी ॲनिव्हर्सरी, सॉरी आप्पू’**

पुण्यातील हडपसर भागासह अनेक ठिकाणी ‘हॅप्पी ॲनिव्हर्सरी, सॉरी आप्पू’ असं लिहिलेले पोस्टर बघायला मिळाले होते. आपल्या नाराज झालेल्या पत्नीला मनवण्यासाठी एका डॉक्टरने हे फ्लेक्स लावल्याची चर्चा होती. दोघेही पती-पत्नी डॉक्टर असून त्यांचा घटस्फोटाचा दावा न्यायालयात सुरु असल्याने पतीने ही पोस्टरबाजी केल्याची चर्चा होती.

**‘‘सविताभाभी, तू इथंच थांब...’’**

पुण्यातील रस्त्यांवर लागलेले ‘‘सविताभाभी, तू इथंच थांब...’’ असा मजकूर असणारे पोस्टर सोशल मीडियावरही व्हायरल झाले होते. काळ्या रंगाच्या पार्श्वभूमी असलेल्या या पोस्टरवर इतर काहीही लिहिलेले नव्हते. मात्र नंतर हे पोस्टर एका चित्रपटाच्या प्रमोशनसाठी लावल्याचं समोर आलं होतं.

**‘शिवडे, आय ॲम सॉरी’**

यापूर्वी पुण्यासह पिंपरी-चिंचवड शहरात ‘शिवडे, आय ॲम सॉरी’ या पोस्टरची चर्चा झाली होती. पिंपरीतील ‘स्मार्ट बायका कुठे जातात’ असा असा मजकूर असलेली पोस्टर व्हायरल झाली होती. त्यावेळी संबंधित फ्लेक्स लावणाऱ्या दुकानदाराने टीका झाल्यावर माफीही मागितली होती.

# पुणे महापालिकेच्या मुद्रणालयात दारु पार्टी! सुरक्षा रक्षकासह वरिष्ठ अधिकाऱ्यांचाही सहभाग?



**पुणे, दि. ३०, (प्रतिनिधी) :** पुण्यातील मामाराव दाते मुद्रणालयात दारु पार्ट रंगत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आलाय. पुण्यातील घोले रस्त्यावर महापालिकेचं मामराव दाते मुद्रणालय आहे. या मुद्रणालयात सुरक्षा रक्षकच पहाटे ३ ते ४ वाजेपर्यंत दारु पाटी करत अशल्याचा प्रकार समोर आला आहे. त्याचा एक व्हिडीओही समोर आलाय. महत्वाची बाब म्हणजे या दारु पाटीत सुरक्षा रक्षकांसह सुरक्षा विभागाचे वरिष्ठ अधिकारीही सहभागी होत असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

इतकंच नाही तर सांस्कृतिक भवनातील काही वस्तू चोरीला गेल्याचा प्रकार उघडकीस आलाय. शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दोन अज्ञातांविरोधात तकार दाखल करण्यात आली आहे. प्रशासन, स्थानिक आमदार, नगरसेवक यांनी याकडे लक्ष देऊन कारवाई करावी अशी मागणी सर्वसामान्य पुणेकरांकडून करण्यात येत आहे. धक्कादायक बाब म्हमजे अतिक्रमण विभागानं कारवाई करुन आणलेले लोखंडी साहित्य मुद्रणालयाच्या शेजारी सांस्कृतिक भवनात असतं. ते साहित्य चोरण्यासाठी चोरांना मुद्रणालयातील सुरक्षा रक्षक मदत करत असतात अशी धक्कादायक माहितीही समोर आलीय.

सुरक्षा रक्षक ओंकार गुरुड हे गुरुवारी पंडित जवाहरलाल नेहरूआर्ट गॅलरी इथं रात्रपाळीत सुरक्षा बजावत असताना सांस्कृतिक भवनातील हातगाडी, पाणीपुरी गाडी चोरुन नेताना त्या चोराला पकडताना प्राणघातक हल्ला झाला होता. त्याबाबत शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दोन अज्ञातांविरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

# ‘त्या’ ३५ बालकांना मदतीचा हात

**पुणे, दि. ३०, (प्रतिनिधी) :** करोनामुळे गेल्या दीड वर्षात शून्य ते अठरा वयोगटातील सुमारे ३५ बालकांच्या डोक्यावरील मातृ-पितृ छत्र हरपले आहे. शासकीय योजनांचा लाभ या बालकांना मिळावा, यासाठी जिल्हा महिला व बालविकास विभागातर्फे या बालकांचे बँकेत खाते खुले करण्याची प्रकिया राबविण्यात येत आहे. लाभाथी बालकांचे बँकेमध्ये खाते असणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर सद्यःस्थितीत २२ बालकांचे बँक खाते उघडण्याची प्रकिया पूर्ण झालेली असल्याची माहिती मिळते आहे. उर्वरित बालकांचे बँक खाते लवकरच उघडण्यात येतील, असे जिल्हा महिला व बालविकास विभागाने स्पष्ट केले आहे. गेल्या दोन वर्षांपासून करोनाने थैमान घातले आहे. यात अनेक कुटुंबे निराधार झाली. आई-वडिलांचा मृत्यू झाल्याने अनेक बालकांच्या भविष्याचा प्रश्न निमा ण झाला आहे. शून्य ते अठरा वयोगटातील या बालकांना आधार मिळावा, यासाठी केंद्र आणि राज्य सरकारकडून अनेक योजनांची घोषणा करण्यात आली आहे. या माध्यमातून जिल्ह्यातील ३५ बालकांना बालसंगोपन योजनेच्या माध्यमातून पाच लाखांची मदत होणार आहे. यासाठी राज्य सरकारकडून सुमारे पावणे दोन कोटींचा निधी नाशिकसाठी देण्यात येणार असल्याची माहिती मिळत आहे. करोना आपत्तीमुळे अनाथ झालेल्या बालकांचे जिल्हा महिला व बालविकास अधिकाऱ्यांसह बँक खाते उघडले जात आहे. कागदपत्रांची पूर्तता झालेल्या २२ बालकांचे खाते आतापर्यंत झालेले असून इतर बालकांचेही कागदपत्रांची पूर्तता करून लवकरच खाते सुरूकेले जाणार आहे.

**सोळाशे बालकांवर आघात**

जिल्ह्यातील अनाथ बालकांच्या माहिती संकलनाची प्रक्रिया शेवटच्या टप्प्यात आली आहे. जिल्ह्याभरातून जवळपास सोळाशेहून अधिक बालके अनाथ झाल्याची धक्कादायक माहिती यातून समोर येत आहे. यातही मुख्यत: ३५ बालकांनी आई आणि वडील दोघांनाही गमावले आहे. त्यामुळे या बालकांच्या संगोपनाची जबाबदारी केंद्र आणि राज्य सरकारने घेतली आहे.


**जाहीर सूचना**

या सुचनेव्दारे कळविण्यांत येते की, **फ्लॅट नं.बी/३०४, तिसरा मजला, 'साई धाम टॉवर' को.ऑ.हा.सो.लि., आचोळे रोड, गांव आचोळे, स.क्र.१४४, नालासोपारा(पुर्व), जि. पालघर-४०१२०९,** च्या सह-मालक-**चंद्राबाई पी. मेहता,** यांचा **दि.३०/०४/२०२१,** रोजी मृत्यु झाला, त्यांच्या मृत्युनंतर त्यांचा मुलगा, वारस व सदर फ्लॅटचे सह-मालक म्हणून सदर फ्लॅटचा अर्धा मालकी हक्क माझे अशिल **श्री. मुकेश पुखराज मेहता,** यांच्या नावे हस्तांतरीत करण्यांत आला आहे व सदर फ्लॅटचे ते एकमेव मालक असून शेअर **सर्टीफीकेट क्र.३५, डीस्टींगक्टीव्ह क्र.१७१ ते १७५,** त्यांच्या नावे दाखल आहे व त्याआधारे आता माझ्या अशिलांनी सदरील फ्लॅट त्यांची एकमेव बहीण **सौ. आशा सी. परमार,** यांच्या लेखी संमतीने खरेदीदार - **श्री. साजिद मोहम्मद जावेद व इतर,** यांस विक्री करारनामा **दि.०१/०९/२०२१, दस्त क्र.११३९४/२०२१,** याव्दारे विक्री करण्याचे मान्य केले आहे, तरी त्यासंदर्भात जर अन्य कोणीही वारस अथवा व्यक्तिचा कुठल्याही प्रकारे हरकत वा हितसंबंध असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत आपल्या हरकतींच्या पुष्ट्यर्थ खालील उल्लेखित पत्त्यावर संपर्क करावा, अन्यथा वरीलप्रमाणे कुठल्याही प्रकारची हरकत वा हितसंबंध नाही असे समजून सदरील फ्लॅटचा खरेदीदार यांचेबरोबर विक्रीचा व्यवहार कायदेशीरपणे पूर्ण केला जाईल, याची कृपया नोंद घ्यावी.

**ॲड. एस.के. चतुर्वेदी ॲन्ड असोशिएटस्**
बी/२०४, सिताराम भवन, आचोळे रोड, नालासोपारा (पु.), जि. पालघर. मोबा.:९३२०६६२१२१

**जाहीर सूचना**

सर्व जनतेस कळविण्यांत येते की, **श्री. राजेश मदन दळवी** व इतर, यांचे मालकी व कब्जावहिवाटीची **गांव मौजे पास्थळ, सर्वे क्र.५०, हि. क्र. ३/२, तालुका/जि.-पालघर-४०१५०४, येथील ०-४८-७० हे.आर.** ही जमीन मिळकत माझे अशिलांनी जमीन मालक यांचेकडून शासकिय खात्याकडून आवश्यक त्या सर्व परवानग्या घेवून डेव्हलपमेंट करण्याकरिता घेतली आहे, तरी सदर मिळकतीवर कोणाही इसमांचा, व्यक्तिचा वा संस्थेचा खरेदी-विक्री व्यवहार, डेव्हलपमेंट, गहाण, दान, बोजा, वारसा, दावा, वहिवाट, अदलाबदल, पोटगी वा अन्य हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून १४ दिवसांचे आत खालील पत्त्यावर योग्य त्या कागदपत्रांसह संपर्क करावा. अन्यथा कोणाही व्यक्तिचा वरीलप्रमाणे हक्क, हितसंबंध नाही असे समजून सदर जमीनीचा डेव्हलपमेंटचा व्यवहार मान्य केला जाईल व त्यानंतर सदर जमीनीवर माझ्या अशिलांना डेव्हलपमेंट करण्याचा पूर्ण हक्क व अधिकार राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

**ॲड. एस.के. चतुर्वेदी ॲन्ड असोशिएटस्**
बी/२०४, सिताराम भवन, आचोळे रोड, नालासोपारा (पु.), जि. पालघर. मोबा.:९३२०६६२१२१

**PUBLIC NOTICE**

**KNOW ALL MEN BY THESE PRESENTS** that my clients Mr.Jagdish Meghraj Chhatwani & Mrs. Deepa Jagdish Chhatwani are lawful owners of Flat No. 205, Rajmata CHS. Ltd., RTO Road, Opp. Saibaba Mandir, 4 Bungalows, Andheri (West), Mumbai- 400053, and holding Share Certificate No. 02 bearing Dist. Nos. 6to 10, which they have purchased from Mr. Uday Chand Barman by entering into Agreement for Sale dated 29.05.1999 in their favour. That original Share Certificate No. 02 issued by Rajmata CHS. Ltd.has been lost / misplaced by my clients and in that regard my clients Mr. Jagdish Meghraj Chhatwani & Mrs. Deepa Jagdish Chhatwani has lodged N.C. bearing No. 2756/2021 dated 20.09.2021 with Andheri Police Station.

Any person/s, legal heirs claiming to be in possession of said original Share Certificate or having any adverse claim or interest over the said flat or part thereof is asked to put the same in writing to me / my client within 15days from the date of publication hereof otherwise no claim shall be entertained.

Place : Mumbai
Date : 01/10/2021

Sd/-
**RATNAKAR T. MISHRA**
**(Advocate High Court)**
Annawadi, Toplewadi, Western Express Highway Opp. Sai Service, Andheri (E), Mumbai 99

**PUBLIC NOTICE**

By this public notice it is informed that the DECEASED **GHISARAM MANNALAL SHARMA & SITADEVI GHISARAM SHARMA** had JOINTLY purchased Flat No. 31 on the First Floor, of the Building "E' admeasuring 650 Sq. Ft Built up area bearing Kalyan Dombivali Municipal Corporation, Kalyan, House No. 500, Property No. A01005467300, in the Building Known as "RAJNIKETAN", in the society known as **"RAJNIKETAN CO OPERATIVE HOUSING SOCIETY LTD",** situated at Plot No. 5, Survey No. 24, Hissa number B/1, B/2, C/2 of Village Shahad, Taluka: Kalyan, District: Thane, and within the limits of Kalyan Dombivali Municipal Corporation and within the Registration District of Thane and Sub Registration District of Kalyan and bounded by: -

**Towards East:** By Raj-Niketan Building No "A"
**Towards West:** By Kalyan- Mohone Road
**Towards South**: By Camps Corner Building
**Towards North:** By Patidar bhavan (Gujrati Hall).

In the year **2010,** the Second owner **Sitadevi Ghashiram Sharma died on 25-05-2010 and thereafter the** first **owner Ghisaram MANNALAL Sharma also died on 29-11-2013,** leaving behind the said legal heirs, (1) **USHA MAHABIR SHARMA**, having maiden name as **Usha Ghisaram Sharma** (DAUGHTER), (2) **Vijaylaxmi SurendraKumar Pandey** (DAUGHTER), **( DECEASED)** (3) **Ashok Ghisaram Sharma** (SON) **( DECEASED)** and (4) **RAJESHWARI CHOMAL having maiden name as Rajeshwari Ghisaram Sharma** (DAUGHTER) , (5) **Anil Ghisaram Sharma** ( SON), (6) **ANITA VINOD SHARMA**, having maiden name as **Anita Ghisaram Sharma** (DAUGHTER), and (7) **AMITA CHOUMAL, having maiden name as AMITA GHISARAM SHARMA** ( DAUGHTER) who are only Legal heirs of the said **Deceased GHISARAM MANNALAL SHARMA & SITADEVI GHISARAM SHARMA.**

Thereafter the Owners **GHISARAM MANNALAL SHARMA & SITADEVI GHISARAM SHARMA** left behind the above mentioned legal heirs.

Now all the Legal heirs have given express consent and no objection **to Anita Ashok Sharma** AND **Anil Ghisaram Sharma** to get the Joint ownership of the said premises.

If any person/persons, institution, bank or any financial institution for any purpose has objection for the said Legal heirs, they are hereby called upon to below mentioned Advocate within 14 days of publishing of this notice

**Place: KALYAN**
**Date: 01/10/2021**
**Add : 3, Shankar Niwas, Syndicate, Murbad Road, Kalyan(W). - Pin Code-421301.**

**Sd/-**
**Adv Bharat H. Parwani**
**Contact : 8767086100**

**NOTICE**

**TATA STEEL LTD.**

**Regd. Office :** Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai, Maharashtra-400 001.

**NOTICE** is hereby given that the certificate for the undermentioned securities of the Company has / have been lost / mislaid and the holder(s) of the said securities / applicants has / have applied to the company to release the new certificate. The Company has informed the holders / applicants that the said shares have been transferred to IEPF as per IEPF Rules.

Any person who has a claim in respect of the said securities should lodge such claim with the company at its Registered Office within 15 days from this date, else the Company will proceed to release the new certificate to the holders / applicants, without further intimation.

| Name of Holder(s) | Kind of Securities & face value | No. of Securities | Distinctive No. |
|---|---|---|---|
| Laherchandbhai Shah | Equity (F. V. ₹ 10/-) | 50 | 184340731-780 |
| Laherchand S. Shah | Equity (F. V. ₹ 10/-) | 50 | 184340631-680 |

sd/-
**Place :** Ahmedabad
**Dated :** 01.10.2021

**Atulkumar Laherchandbhai Shah**
Name of Applicant

**DHANVARSHA FINVEST LIMITED**

**Regd. Office: 2nd Floor, Building No. 4, D J House**
**Old Nagardas Road, Andheri (East), Mumbai - 400 069**
**CIN: L24231MH1994PLC334457**
**Website: www.dflltd.in Phone No. 022- 2826 4295**

**NOTICE OF RECORD DATE**

**Notice** is hereby given to the members of the Company that pursuant to Regulation 42 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 and other applicable provisions of the Companies Act, 2013, the Board of Directors has fixed Thursday, October 14, 2021 as the Record Date for the purpose of sub-division of each Equity Share of the Company of nominal value of Rs. 10/- each (Rupees Ten only) in the Capital of the Company into 5 Equity Shares of Rs. 2/- each (Rupees Two only) and all the equity shares of Rs. 10/- each (Rupees Ten only) of the Company and for ascertaining the eligibility of the members entitled to receive the sub-divided Equity Shares of Rs. 2/- each in lieu of the existing Equity Shares of Rs. 10/- each. Consequently, the Equity Shares having face value of Rs. 10/- each shall automatically stands cancelled and be of no effect on and from the said Record Date i.e. October 14, 2021.

The Company hereby undertakes that it will set up Auto Corporate Action with both the Depositories i.e. National Securities Depository Limited and Central Depository Services (India) Limited for execution before beginning of the day on the trading day succeeding the Record Date.

The above information is also available on Company's website i.e. www.dflltd.in and also on the website of the Stock Exchange viz. BSE Limited i.e. www.bseindia.com.

**Place: Mumbai**
**Date: September 30, 2021**

**For Dhanvarsha Finvest Limited**
**Sd/-**
**Rohanjeet Singh Juneja**
**Joint Managing Director**
**DIN: 08342094**

**जाहीर सूचना**

सर्व सामान्य जनतेस येथे सूचना देण्यात येते की, **(१) श्री. अनिल कमलाकर ठाकूर, (२) श्रीमती प्रतिभा मोहन ठाकूर, (३) श्रीमती माधवी मोहन महात्रे, (४) श्री. मोहन प्रभाकर ठाकूर, (५) श्री. यतिन नंदकुमार जुकर, (६) श्रीमती लता शैलेंद्र पाठारे, (७) श्रीमती सुनिता जयवंत पाटणकर, (८) श्रीमती स्मिता दत्तात्रय वाळंजु ऊर्फ श्रीमती सुनिता दत्तात्रय वाळंजु, (९) श्री. सुनिल कमलाकर ठाकूर व (१०) श्रीमती सुनिता कमलकांत शिरोडकर ऊर्फ श्रीमती स्मिता कमलाकर शिरोडकर** या विद्यमान मालकांकडून खालील अनुसुचीत सविस्तरपणे नमुद केलेली मालमत्ता खरेदी करण्याचे माझ्या अशिलांनी मान्य केले आहे.

जर कोणा व्यक्तिस सदर खालील अनुसुचीत सदर मालमत्ता किंवा भागावर वारसाहक्क, विक्री, अदलाबदल, मुक्तता, भाडेपट्टा, मालकीहक्क, ताबा, जप्ती, लिस पेन्डन्स, तारण, भागिदारी, अधिभार, बक्षीस किंवा अन्य इतर प्रकारे कोणत्याही स्वरूपाचा कोणताही अधिकार, हक्क, मागणी किंवा दावा असल्यास त्यांनी सदर सूचना प्रकाशना पासून **१४ (चौदा)** दिवसांच्या आत खालील स्वाक्षरीकर्ताकडे सर्व पृष्ठयर्थ दस्तावेजांच्या प्रतींसह कळवावे. अन्यथा अशा व्यक्ती/संघटना/संस्था यांचे असे दावे असल्यास ते सोडून दिले आहेत असे समजण्यात येईल आणि ते माझ्या अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत आणि सर्व अधिभारापासून मुक्त व स्पष्ट बाजारभाव असलेल्या सदर अनुसुचीत मालमत्तेच्या अधिकाराच्या आधारावर माझे अशील व्यवहार सुरू करतील.

**मालमत्तेची अनुसुची**

शेत जमीन क्षेत्रफळ १८१५ चौ.मी. तसेच त्यावर उभी असलेली संरचना आणि झोपडपट्टी/भाडेकरू/वहिवाटदाराद्वारे व्यापलेली जागा, सर्व्हे क्र.१६६, हिस्सा क्र.१, सीटीएस क्र.२४२२/ए/४, महसूल गाव, दहिसर, तालुका बोरिवली, नोंदणी जिल्हा व उपजिल्हा मुंबई शहर व मुंबई उपनगर, शिव वल्लभ रोड, रावळपाडा, दहिसर (पुर्व), मुंबई-४०००६८ येथील जमिनीचे सर्व भाग व खंड आणि चतुसिमा खालीलप्रमाणे:-

पुर्वेस: सीटीएस क्र.२४२८;
पश्चिमेस: सीटीएस क्र.२४२१, २४१५, २४२२ए/३;
दक्षिणेस: सीटीएस क्र.२४२२बी;
उत्तरेस: सीटीएस क्र.२४३८;

आज दिनांकीत ३० सप्टेंबर, २०२१

**सही/-**
**आर. जे. चोथानी**
**वकील**
डी-१०४, अंबिका दर्शन, सी.पी.रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई-४००१०१.


**मुख्य कार्यालय** - एम. एस. मीडिया ॲण्ड पब्लिकेशन प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक, **व्ही.पी. चांदवडकर** यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. ३ आणि ४, अमिन इंडस्ट्रीअल इस्टेट, सोनावाला क्रॉस रोड, नं. २, जवाहर नगर फाटक ब्रीज, गोरेगाव (पूर्व), मुंबई- ४०० ०६३ येथे छापून एम. एस. मीडिया ॲण्ड पब्लिकेशन प्रा. लि. केसर प्लाझा, ५०२ ए/विंग, प्लॉट नं.२३९. आर. डी. पी-६ म्हाडा लेआऊट, चारकोप, कांदिवली (प.), मुंबई ४०००६७ येथून प्रसिद्ध केले. दूरध्वनी : ०२२-२०८९१२७६, ०२२-२८६९७६४५/४७, ०९८३३८९१८८८, ९८३३८५२१११ फॅक्स :२८६८२७४४ अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधील व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. **संपादक- डी.एन.शिंदे, कायदेविषयक सल्लागार- ॲड. भानुदास जगताप आणि एमकेएस लिगल असोसिएट्स,** RNI No. MAHAMAR/2001/05426. ई-मेल : mumbai.lakshadeep@gmail.com, lakshadeepp@rediffmail.com./msmedia@rediffmail.com, mumbailakshadeepnews@gmail.com.